**स्पे.दि.मु.नं.९३/२०१९**

## नि.३१ वरील आदेश
## (CNRN0MHSN020007092019)

प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी प्रस्तुतचा अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११ प्रमाणे, वादपत्र फेटाळणेकरिता दाखल करणेत आलेला आहे.

**संक्षिप्तमध्ये अर्ज असा की,**

०२. वादीने प्रस्तुत दावा, त्यामध्ये पुर्वी झालेल्या दाव्यांची वस्तुस्थिती नमुद न करता व त्याबाबत स्पष्टीकरण न देता खोटेपणावर आधारुन दाखल केलेला आहे. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाने घालुन दिलेल्या केसमधील मापदंडाच्या विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वस्तुतः वादीच्या वडिलांनी दाखल केलेला स्पे.दि.मु.नं. ५१५/२००० या दाव्याचा गुणदोषावर दिनांक १७.०७.२००९ रोजी निर्णय होवून दावा रद्द करण्यात आला. त्या आदेशा विरुध्द नियमित दिवाणी अपिल नं.२६४/२००९, वादीच्या वडिलांनी दाखल केले होते ते उपशमित झाल्यामुळे निकाली करण्यात आले. उपशमित झालेला आदेश रद्द होवून मिळणेकरीता वादी यांनी कि.दि.अर्ज नं.२०७/२०१८ मा.जिल्हा न्यायालयात दाखल केला होता. सदरच्या बाबी वादीने दाव्यात नमुद केलेल्या नाहीत. वादीच्या दाव्यास constructive resjudicata या तत्वाची बाधा येते. पुर्वी झालेल्या दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ हेच पक्षकार होते व तो दावा एकत्र कुटुंबाच्या मिळकतीच्या वाटपाबाबत दाखल केला होता. प्रस्तुतचा दावा त्याच कारणावरुन दाखल केला असल्यामुळे त्यास पुर्व न्याय या तत्वाची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास कायदयातील तत्वांची बाधा येत असल्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११ प्रमाणे रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०३. वादीने नि.३४ येथे अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने अमान्य केलेली आहेत. वादीने म्हणण्यात असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा आणि पुर्वी झालेल्या दाव्यातील मुद्दे, पक्षकार आणि दाव्यास कारण निरनिराळे आहे. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये कोणतीही बाब लपविलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी दिलेला अर्ज नामंजूर करणेत यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वादीच्या वडिलांनी रे.दि.मु.नं.५१५/२००० हा दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरीत दाखल केला होता. तो दावा गुणदोषावर फेटाळण्यात आला आहे. त्याविरुध्द अपिल दाखल केले होते. ते उपशमित झाले, म्हणून वादीने कि.दि.अर्ज नं.२०७/२११८ हा उपशमित झालेला आदेश रद्द होण्याकरीता दाखल केला. सदरच्या बाबी प्रस्तुत दाव्यामध्ये वादींनी उघड केलेल्या नाहीत. त्यामुळे वादीने लबाडीने प्रस्तुतचा दावा दाखल केला असून, '**MEGHMALA & ORS. V/S. G. NARASIMHA REDDY & ORS., reported in (2010) 8 SCC 383** या निर्णय विधीमधील प्रमाणानुसार प्रस्तुतच्या दाव्यामध्ये पुर्वीच्या दाव्याबाबत कोणतेही कथन न करता, न्यायालयीन प्रक्रियेचा दुरुपयोग करण्याच्या हेतुने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. तसेच प्रस्तुतचा दावा देखील वाटपाकरीता दाखल केला असल्यामुळे, वाटपाबाबतचा मुद्दा पुर्वीच्या दाव्यात निर्णीत झालेला आहे, त्यामुळे प्रस्तुत दाव्यास पुर्व न्यायतत्वाची बाधा येते.

०५. वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, रे.दि.मु.नं.५१५/२००० हा दावा एकत्र कुटुंबाच्या सर्व मिळकती दाव्यात समाविष्ठ केल्या नाहीत या तांत्रीक मुद्दयावरुन रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास पुर्व न्यायतत्वाची बाधा येत नाही.

०६. रे.दि.मु.नं.५१५/२००० हा दावा सि.स.नं. ४३५/३ आणि ग्रामपंचायत मिळकत नं.६४८/क या मिळकती एकत्र कुटुंबाच्या असताना त्या एकत्र कुटुंबाच्या

मिळकती म्हणून समाविष्ठ केलेल्या नाहीत, त्यामुळे हिंदु कायदयातील तत्वानुसार वाटपाकरीता सर्व मिळकती दाव्यात समाविष्ठ न केल्यामुळे दावा फेटाळण्यात आला. रे.दि.नं.५१५/२००० चे कामी दावा मिळकतीपैकी, सर्व्हे नं.३९/२, सि.स.नं.२३८ आणि २४० या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असून, वडिलांनी खरेदी घेतलेल्या मिळकती आहेत. सि.स.नं. ४३५, ४३५/१, ४३५/२ व ४३५/३ या मिळकती कै.जनार्धन, प्रतिवादी क्र.१, २, कमल, मालती, लक्ष्मीबाई आणि छबुताई यांच्या आई हिला तिच्या आईकडून मिळाल्या होत्या. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये त्यांच्या वारसांचा प्रत्येकी १/६ हिस्सा आहे असे निष्कर्षीत करण्यात आलेले आहे. अशा स्थितीत वादी व प्रतिवादी यांचे, त्यांच्यामध्ये चतुःसिमा ठरवुन वाटप झाले अशी त्यांची केस नाही. अशा स्थितीत प्रतिवादी क.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.६ व ७ यांना दिनांक १४.०२.२०१९ रोजी वाद मिळकत स.नं.३९/३ मधील त्यांच्या १/५ समाईक हिश्याची विक्री केली. त्यामुळे त्या अनुशंगाने वादीने दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कोणतेही रितसर वाटप आजअखेर झालेले नाही हे प्रतिवादी यांना मान्य आहे. वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा कोठे आहे याबाबत स्पष्टपणे कोठेही नमुद नाही असे वाटपात कथन केले आहे. अशा स्थितीत प्रस्तुतचा दावा हा दिनांक १४.०२.२०१९ रोजी झालेल्या खरेदीपत्रावरुन, त्यादिवशी दाव्यास कारण घडले या कारणावरुन सदर दिवशी झालेली खरेदीपत्रे वादीवर बंधनकारक नाहीत आणि वादींचा दावा मिळकतीतील हिस्सा पृथक करुन मिळणेसाठी वादीनी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास पुर्व न्याय या तत्वाची बाधा उत्पन्न होणार नाही. दिवाणी प्रक्रिया सहिंता, आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज निर्णित करीत असताना केवळ वाद पत्रातील कथनांचे अवलोकन करणे अभिप्रेत आहे. अशा स्थितीत वादपत्रातील कथन पाहता, प्रतिवादी यांनी आधार घेतलेल्या '**MEGHMALA & ORS. V/S. G. NARASIMHA REDDY & ORS., reported in (2010) 8 SCC 383** या निर्णयविधीमधील प्रमाण लागु होत नाही. **सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो**.

**आ दे श**

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

Rupali Jinagonda Patil
Digitally signed by Rupali Jinagonda Patil
Date: 2019.08.22 17:44:05 +05'30'

सांगली. **(श्रीमती आर. जे. पाटील)**
दिनांक २१.०८.२०१९ चौथे–सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | J. R. More |
| Court | : | 4th Jt.Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date | : | 21-08-2019 |
| Signed by the Presiding Offer on | : | 21-08-2019 |
| Order uploaded on | : | 22-08-2019 |